मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये ११३६ अधिकृत जाहिरात फलक

## पालिकेच्या वतीने गेल्या पाच वर्षांत दोन वेळा बाह्य जाहिरात धोरण तयार

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरातील १७४ अनधिकृत जाहिरात फलक काढले असून आता केवळ एक हजार १३६ अधिकृत जाहिरात फलक आहेत. यापुढील काळात अनधिकृत फलक आढळल्यास जमीनदोस्त केले जातील, असा इशारा महापालिकेच्या आकाश चिन्ह व परवाना विभागाने दिला आहे. महापालिकेच्या वतीने गेल्या पाच वर्षांत दोन वेळा बाह्य जाहिरात धोरण तयार करण्यात आले. त्याची अंमलबजावणी करण्याची संपूर्ण तयारी करण्यात आली. मात्र, २०२२ मधील राज्य




शासनाच्या अधिसूचनेनुसार नवे धोरण स्वीकारण्यात आले. महापालिकेचे पूर्वीचे धोरण रद्द करण्यात आले. किवळेतील अनधिकृत फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर प्रशासनाने नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार शहरातील १७४ अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार नियमानुसार असलेल्या जाहिरात फलक व्यावसायिकांकडून आवश्यक कागदपत्रांसह परवाना शुल्क भरून घेण्यात येत आहे. न्यायालयात गेलेल्या २८१ फलक धारकांकडून स्थापत्यविषयक स्थिरता प्रमाणपत्र घेतले आहे. त्यांनी थकीत चार कोटी ६१ लाख महापालिका तिजोरित जमा केले आहेत. शहरातील एक हजार १३६ अधिकृत जाहिरात फलकधारकांपैकी ८६१ जणांनी नूतनीकरणासाठी अर्ज केले आहे. नूतनीकरणासाठी सादर करण्यात आलेल्या अर्जाची तपासणी केली जाणार आहे. अर्जात जाहिरात फलकाचा आकार ४० फूट बाय २० फूट आहे. नियमानुसार फलकावर नंबरची पाटी, क्यूआर कोड नसल्यास, सांगाडे गंजलेले किंवा सडलेले असल्यास त्या फलकाला परवानगी दिली जाणार नसून कारवाई केली जाणार असल्याचे उपायुक्त सुभाष इंगळे यांनी सांगितले.

### शहरातील १७४ अनधिकृत जाहिरात फलकांवर करण्यात आली कारवाई

**» महापालिकेचे पूर्वीचे धोरण रद्द करण्यात आले. किवळेतील अनधिकृत फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर प्रशासनाने नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार शहरातील १७४ अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार नियमानुसार असलेल्या जाहिरात फलक व्यावसायिकांकडून आवश्यक कागदपत्रांसह परवाना शुल्क भरून घेण्यात येत आहे. न्यायालयात गेलेल्या २८१ फलक धारकांकडून स्थापत्यविषयक स्थिरता प्रमाणपत्र घेतले आहे.**

# पीएमपीएमएलने केली एका दिवसात दोन कोटींची कमाई

## १२ लाख २३ हजार प्रवाशांनी केला प्रवास

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत पुणे, पिंपरी चिंचवड शहरव त्यालगतच्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात प्रवाशांकरीता बससेवा पुरविण्यात येते.मार्गावर १६९८ बसेस संचलनात होत्या. जास्त उत्पन्नाच्या मार्गावर जादा बसेस सोडण्यात आल्या होत्या. त्यामुळे परिवहन महामंडळास सोमवारी एका दिवसात दोन कोटी सहा लाख ३१ हजार ९४५ इतके उत्पन्न मिळाले आहे. सोमवारी १२ लाख २३ हजार ८७ प्रवाशांनी बससेवेचा लाभ घेतला. दिपावली सुट्टी संपत असल्याने परगावीगेलेले प्रवासी परतत असल्याने मार्गावर प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने प्रवाशांची गैरसोय होऊ नये व प्रवाशांना सुरक्षित उत्तम दर्जाची तत्पर बससेवा देण्यासाठी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी सर्व अधिका-यांना परिवहन महामंडळाच्या बसेस पूर्ण क्षमतेने व सर्व नियोजीत शेड्युल मार्गस्थ करण्याच्या सुचना दिल्या होत्या. तसेच महत्वाच्या बसस्थानकावर बससंचलनावर नियंत्रणासाठी व प्रवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी आगार व्यवस्थापक यांच्या नेमणूका करण्यात आल्या होत्या. मजूर, कामगार, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक, महिला प्रवाशांनी पीएमपीएमएलच्या बससेवेवर नेहमीच विश्वास दाखवला आहे. त्याचबरोबर शहरातील शाळा व कॉलेज पुन्हा पूर्ण क्षमतेने सुरू झाल्याने दररोज प्रवास करणाऱ्या विद्यार्थी संख्येत देखील लक्षणीय वाढ झाली आहे. दैनंदिन प्रवाशी संख्या व दैनंदिन उत्पन्नामध्ये झालेली वाढ हा प्रवाशांनी पीएमपीएमएलच्या बससेवेवर दाखविलेला विश्वास आहे. प्रवाशांनी पीएमपीएमएलच्या पर्यावरणपूरक स्मार्ट एसी ईलेक्ट्रीक बस व सीएनजी बसेसचा जास्तीत जास्त वापर करावा असे आवाहन ीएमपीएमएल कडून करण्यात आले आहे.

# पालिकेच्या १४ कर्मचाऱ्यांना ओळखपत्राची ‘अलर्जी’!

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या तपासणी पथकाकडून आज (मंगळवारी) मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेशद्वारावर पालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या गणवेश व ओळखपत्रांची तपासणी करण्यात आली. उप आयुक्त विठ्ठल जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या तपासणीत १४ जणांनी ओळखपत्र लावलेले नसल्याचे आढळून आले. पिंपरी-चिंचवड महापालिकेत आठ हजाराहून अधिककर्मचारी आहेत. सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश निश्चित केला आहे. कर्मचाऱ्यांना दररोज गणवेश परिधान करणे बंधनकारक आहे. तसेच ओळखपत्र लावणे आवश्यक आहे. मात्र, अनेक कर्मचारी गणवेश परिधान करताना दिसत नाहीत. ओळखपत्र लावत नाहीत. त्यामुळे प्रशासनाने आज अचानक तपासणी केली. तपासणी पथकाने मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेशद्वारावर पालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या गणवेश व ओळखपत्रांची तपासणी केली. या तपासणीत १४ जणांनी ओळखपत्र लावलेले नसल्याचे आढळून आले.

# तळवडे- मोशी वाहतूक कोंडी सुटणार!

## मोशी शिवरस्ता रस्त्याचे भूमिपूजन: आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
तळवडे ते मोशी रोडवरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मोशी शिवरस्ता ते पुणे-नाशिक महामार्गापर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल, असा शब्द स्थानिक नागरिक आणि सोसायटीधारकांना दिला होता. महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले.



वर्षभरात रस्त्याचे काम पूर्ण होईल. त्यामुळे औद्योगिक पट्ट्यासह निवासी क्षेत्रातील नागरिक, वाहनचालकांना 'ट्रॅफिकमुक्त' प्रवास करता येईल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला. मोशी येथे आमदार महेश लांडगे यांच्याहस्ते प्रस्तावित रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे, अश्विनी जाधव, उद्योजक संतोष बारणे, निलेश बोराटे, निखिल बोऱ्हाडे, संतोष जाधव, सागर हिंगणे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ, नागरिक आणि सोसायटीधारक उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापत्य विभागाकडून प्रभाग क्रमांक २ मोशी गट नं. १२५२ शिवरस्ता ते गट नं. ७५२ (पुणे नाशिक हायवे) पर्यंतच्या ३० मीटर रुंद डी.पी. रस्त्याचे काम करण्यात येणार आहे. मोशी ते देहू फाटा दरम्यान मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या होती. त्यामुळे हा रस्ता विकसित करण्याची आवश्यकता होती. माजी महापौर राहुल जाधव म्हणाले की, मोशी शिवरस्ता ते पुणे-नाशिक महामार्गापर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण केल्यामुळे मोशी ते देहू फाटाहून चिखलीच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना होणारी वाहतूक कोंडीची त्रास कमी होईल. दळणवळण वाढणार असून स्थानिक शेतकरी आणि सोसायटीधारकांनाही रस्ता उपलब्ध होणार आहे. तसेच, चिखली-हवालदार वस्तीमार्गे आखणी एक नवीन रस्त्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात हा रस्ता चिखली-मोशी रस्त्याला समांतर रस्ता म्हणून उपयोगात येईल.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे वनविभागाच्या जमिनीची विक्री

## वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या नावाचे बनावट पत्र तयार

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या बनावट पात्रांच्या (ढश्रशशसरेप) आधारे वन विभागाच्या दोन हजार ९४२ गुंठे जमिनीची विक्री करत शासनाची फसवणूक केल्याचा प्रकार दुय्यम निबंधक मावळ दोन, तळेगाव दाभाडे येथे उघडकीस आला. १६ डिसेंबर २०२० ते २१ जानेवारी २०२१ या कालावधीत हा प्रकार घडला. रफिक दाऊद रुवाला (वय ७३), आली अजगर, एक महिला (सर्व रा. नेरूळ रोड, ठाणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी



आंबवणे येथील वनपाल संजय आहिरराव यांनी मंगळवारी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ताम्हिणी वन परिक्षेत्राच्या (ढश्रशशसरेप) अखत्यारीत काही क्षेत्र खासगी वन संपादन अधिनियम १९७५ अंतर्गत येते. त्या जमिनीची विक्री करण्यासाठी वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांची परवानगी अनिवार्य असते. आरोपींनी या जमिनीतील दोन हजार ९४२ गुंठे जमीन विक्रीयोग्य असल्याचे वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या नावाचे बनावट पत्र तयार केले. त्या पत्राच्या आधारे दुय्यम निबंधक मावळ दोन, तळेगाव दाभाडे येथे तीन वेगवेगळे दस्त करून वन विभागाचे क्षेत्र बेकायदेशीरपणे हस्तांतरित केले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पिंपरी येथे नऊ डिसेंबर रोजी लोकन्यायालयाचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पिंपरी येथे नऊ डिसेंबर रोजी लोकन्यायालयाचे आयो जनण्यात येणार आहे. यामध्ये वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याबाबत झालेल्या कारवाईची प्रकरणे तसेच इतर विविध प्रकरणे सामंजस्याने आणि तडजोडीने निकाली काढली जाणार आहेत. या लोकन्यायालयाचे आयोजन पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे. एखादा वाद उद्भवला तर तो सामंजस्याने सोडवावा ही आपली प्राचीन परंपरा आहे. गावातील निःपक्षपाती लोक गावातील वाद सोडवत असत. त्यालाच गाव पंचायत असे म्हटले जात. त्याचं गाव पंचायतचे आधुनिक रूप म्हणजे लोकन्यायालय आहे. लोकन्यायालयात विविध प्रकरणे सामंजस्याने आणि तडजोडीतून निकाली काढली जातात. पक्षकारांचा वेळ आणि पैशांची बचत करून त्यांना न्यायाचा दिलासा देण्याच्या हेतूने पिंपरी न्यायालयात लोकन्यायालय भरवण्यात येणार आहे. वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या वाहन चालकांवर वाहतूक पोलिसांकडून दंडात्मक कारवाई केली जाते. ही दंडाची रक्कम वेळेत भरली नाही तर वाहन मालकाला न्यायालयामार्फत नोटीस पाठवली जाते.

# जो रामाचा-तो कामाचा : फडणवीस

## धीरेंद्र शास्त्रींकडून देवेंद्र फडणवीसांचं तोंडभरून कौतुक

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यामध्ये जगदीश मुळीक फाऊंडेशन तर्फे धीरेंद्र शास्त्री ऊर्फ बागेश्वर धाम सरकार यांच्या 'हनुमान कथा सत्संग' कार्यक्रमाचे येथे तीन दिवस आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आज राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. यावेळी धीरेंद्र शास्त्री यांनी देवेंद्र फडणवीस यांचे तोंडभरून कौतुक केले आहे. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री आहेत म्हणून मी त्यांचं कौतुक केलेलं नाही. ते रामभक्त आहेत म्हणून मी त्यांच्याविषयी बोलतो आहे. जे रामाचे भक्त असतात ते सगळ्यांचे असतात. जे रामाचे भक्त नसतात ते कुणाचेच नसतात, असं वक्तव्य धीरेंद्र शास्त्री यांनी केलं. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी बागेश्वर बाबा सनातन धर्मासाठी उत्तम काम करत असल्याचं म्हटलं



आहे. सनातन धर्म रुढीवादी, जातीयवादी असल्याचा अपप्रचार काही लोक करतात. सनातन म्हणजे अनादी आणि अनंत... सनातन धर्म सगळ्यांना जोडणारा आहे. तिथे उच्च नीच असा भेदभाव नाही. सर्व ईश्वरांची मुले आहेत. हा भारताचा विचार आहे, असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. फडणवीस पुढे म्हणाले, ' सर्व देश जागा होतोय. भारत जागा झाला तर जग जागं होईल. २२ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अयोध्येत प्रभू रामचंद्राचे मंदिर होत आहे. ज्या ठिकाणी राम लल्ला विराजमान होते, त्याच ठिकाणी हे मंदिर होत आहे. ज्याला प्रभू रामचंद्राची कथा ऐकण्याची संधी मिळते, त्याचे जीवन सफल होते. पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या धीरेंद्र शास्त्री यांच्या सत्संगाला अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. या कार्यक्रमाला अंधश्रद्धा निर्मूलन समिती व भीम आर्मी एकता बहुजन संघटनेकडून विरोध दर्शवण्यात आला होता. कार्यक्रमाला राजकीय, उद्योग क्षेत्रातील मंडळींनी हजेरी लावल्याचे पाहायला मिळाले. कार्यक्रमाच्या दुसर्या दिवशी दिव्य दरबार कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने नागरिक आले होते. सभा मंडपातील विविध भाविकांना व्यासपीठावर बोलावून त्यांच्या समस्या आणि त्यावर उपाय सांगताना धीरेंद्र शास्त्री पहावयास मिळाले. त्याच दरम्यान कार्यक्रमाच्या ठिकाणी बंदोबस्तावर असलेल्या एका पोलिस

### पोलिस अधिकाऱ्याला अश्रू अनावर

**» कार्यक्रमाच्या दुसर्या दिवशी दिव्य दरबार कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने नागरिक आले होते. सभा मंडपातील विविध भाविकांना व्यासपीठावर बोलावून त्यांच्या समस्या आणि त्यावर उपाय सांगताना धीरेंद्र शास्त्री पहावयास मिळाले. त्याच दरम्यान कार्यक्रमाच्या ठिकाणी बंदोबस्तावर असलेल्या एका पोलिस अधिकाऱ्याला धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी बोलावून त्याच्या समस्या आणि त्यावर उपाय सांगितले. ते सर्व ऐकून पोलिस अधिकाऱ्याला अश्रू अनावर झाले. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाल्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने या पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.**

अधिकाऱ्याला धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी बोलावून त्याच्या समस्या आणि त्यावर उपाय सांगितले. ते सर्व ऐकून पोलिस अधिकाऱ्याला अश्रू अनावर झाले. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाल्यानंतर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने या पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. मात्र, या घटनेच्या दुसऱ्याच दिवशी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः वीरेंद्र शास्त्री यांच्या दरबारात हजेरी लावून त्यांच्यासमोर लीन झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे आता पोलीस दलाचे मुख्य असणारे गृहमंत्रीच जर धीरेंद्र शास्त्री यांच्या चरणी लीन होत असतील तर दाद मागायची कुणाकडे? अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

# तुकाराम महाराजांवर वादग्रस्त वक्तव्य केल्याची चूक!

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसह अनेक संघटना आक्रमक

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी संत तुकाराम महाराजांवर वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी महाराष्ट्रात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसह अनेक संघटना आक्रमक झाल्या. तसेच त्यांनी धीरेंद्र शास्त्रींच्या दाव्याला आव्हानही दिलं. या पार्श्वभूमीवर धीरेंद्र शास्त्रींनी बुधवारी (२२ नोव्हेंबर) देहूत जाऊन संत तुकाराम महाराज मंदिरात दर्शन घेतलं. यावेळी पत्रकारांनी धीरेंद्र शास्त्रींना संत तुकाराम महाराजांवर केलेल्या वादग्रस्त वक्तव्याच्या चुकीची जाणीव झाली का? असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी



त्यांची भूमिका मांडली. धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणाले, मी तेव्हा एक लेख वाचला होता. त्या लेखाच्या आधारे मी त्या भाषेत बोललो होतो. त्याआधीही मी महाराष्ट्रात आलो होतो. त्यामुळे मला संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांच्याविषयी माहिती आहे. मी त्यांच्याविषयी जेवढं शक्य होतं तेवढं वाचलं आहे. मी असं कधीही कोणत्याही संताविषयी म्हटलेलं नाही. तेव्हा बोलताना माझ्यावर स्थानिक भाषेचा प्रभाव होता. कुणी साखर म्हणतं, तर कुणी शुगर म्हणतं. त्यामुळे मी निश्चितपणे स्वीकारलं की, माझ्या बोलण्यामुळे वारकरी संप्रदाय आणि संत तुकाराम महाराजांना मानणाऱ्या लोकांच्या भावना दुखावल्या. माझ्या बोलण्यात काही दोष असेल तर, तो मी स्वीकारला आणि सुधारणा केली, असं मत धीरेंद्र शास्त्रींनी व्यक्त केलं. मी आचार्य परंपरेचा साधक आहे. असा व्यक्ती कोणत्याही संताचा विरोध करेल असं होणार नाही. तसेच असा विरोध करणारा संतांचा अनुयायी होऊच शकत नाही. मी भारत हिंदूराष्ट्र व्हावं हा संकल्प घेऊन निघालो आहे. त्यामुळे मी संत महात्म्यांची प्रशंसा करण्याऐवजी विरोध करत असेल, तर पाश्चिमात्य संस्कृतीचे संस्कार आमचा हा प्लॅनच गिळून टाकतील. म्हणूनच मी हात जोडून संपूर्ण वारकरी संप्रदायासमोर खेद व्यक्त केला होता, असंही धीरेंद्र शास्त्री यांनी नमूद केलं. धीरेंद्र शास्त्री म्हणाले, मी संत तुकाराम महाराजांच्या शीलेचं दर्शन घेतलं. त्यांनी आपले अभंग इंद्रायणी नदीत सोडून दिले होते. मात्र, संत तुकारामांच्या तपस्येमुळे ते अभंग नदीत बुडाले नाहीत. त्यांना पाण्याचा स्पर्शही झाला नाही आणि ते पाण्यावर तरंगले. ही संतांची परंपरा आहे. भारत अद्भूत देश आहे. या संतांचा आशीर्वाद कायम राहिला, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचं स्वप्न संपूर्ण भारतात यशस्वी होईल. तसेच भारत हिंदूराष्ट्र होईल, अशीच प्रार्थना मी केली आहे, असंही धीरेंद्र शास्त्रींनी नमूद केलं.

# कृषी निविष्ठाधारकांचा बंद सकारात्मक चर्चेनंतर स्थगित!

## २० नोव्हेंबरपासून नव्याने बि-बियाणे, खरेदी थांबविली होती

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील नवीन कृषी विधेयकाबाबत राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या कायद्यातील दुरुस्तीनंतर कृषी निविष्ठा विक्रेत्यांना कोणताही त्रास होणार नसल्याचे स्पष्टीकरण कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी संयुक्त बैठकीत दिले. या बाबत मंत्रालयात झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर राज्यात बंद केलेली कृषी निविष्ठा खरेदी आणि ५ डिसेंबरपासूनचा बेमुदत बंद स्थगित करण्याचा निर्णय महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टीसाईडस् सीडस डिलर्स असोसिएशनने (माफदा) घेतला आहे.

कृषी कायद्यातील प्रस्तावित जाचक अटींच्या विरोधात कृषी निविष्ठाधारकांनी २० नोव्हेंबरपासून नव्याने बि-बियाणे, खते, औषधांची खरेदी थांबविली होती. त्यावर कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कृषी निविष्ठा विक्रेता संघटनेशी संपर्क साधून आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले होते. त्या विषयावर बुधवारी (दि.२२) मंत्रालयात मुंडे यांनी कृषी निविष्ठा विक्रेत्यांसमवेत बैठक घेतली. या बैठकीस सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील, आमदार दिलीप बनकर, आमदार किशोर पाटील, कृषी विभागाचे सचिव सुनिल चव्हाण, कृषी आयुक्त डॉ प्रवीण गेडाम, कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) विकास



पाटील, अवर सचिव उमेश चंदिवडे, कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या संघटनेचे अध्यक्ष विनोद तराळ-पाटील, महासचिव बिपिन कासलीवाल, मनमोहन कलंत्री, जगन्नाथ काळे, राजेंद्र पाटील, माफदाचे संचालक व पुणे जिल्हाध्यक्ष महेश मोरे, प्रकार मुथा, दिपक मालपुरे, राजेंद्र भंडारी, आनंद निलावार, प्रशांत पोळ यांच्यासह राज्यभरातील निविष्ठा विक्रेत्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीनंतर माहिती देताना माफदाचे संचालक महेश मोरे म्हणाले, राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांकडून कोणत्याही कृषी निविष्ठांचे उत्पादन केले जात नाही. त्यामुळे कृषी निविष्ठांच्या गुणवत्तेबाबत विक्रेत्यांना दोषी समजण्यात येऊ नये. तसेच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्यानुसार निविष्ठा विक्रेत्यांवर कोणत्याही स्वरूपाची कारवाई करण्यात येऊ नये अशा प्रमुख मागण्या संघटनेच्या पदाधिकार्यांनी बैठकीत केल्या. त्यानंतर कृषीमंत्री मुंडे यांनी राज्यातील निविष्ठा विक्रेत्यांना या कायद्याच्या माध्यमातून कोणताही त्रास होणार नसल्याचे आश्वासन दिले आहे. तसेच निविष्ठा विक्रेत्यांवर कोणताही गुन्हा दाखल करण्यात येणार नाही. तर त्यांना साक्षीदार करून तपासात त्यांची मदत घेतली जाईल. राज्यात बोगस बियाणे परराज्यातून येते. परंतु या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर बोगस बियाणे येणे बंद होईल व त्यामुळे शेतकर्यांची होणारी फसवणूक थांबेल. त्यामुळे निविष्ठा विक्रेत्यांनी या कायद्यांच्या माध्यमातून शासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. बोगस बियाण्यांच्या ट्रॅकिंगसाठी बारकोड, क्यूआर कोडसारखी आधुनिक प्रणाली वापरण्यात येणार असल्याचे स्पष्ट करीत निविष्ठा विक्रेत्यांच्या विविध समस्यांचे समाधान केले. त्यानंतर संघटनेने बंद स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याचे मोरे यांनी सांगितले.

# जागतिक साखर उत्पादनात ३५ लाख टन घट!

## जगात दरवर्षी सरासरी १७०८.६२ लाख टन साखर उत्पादन होते

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** प्रशांत महासागरात सक्रिय असलेल्या एल निनोचा परिणाम म्हणून जागतिक साखर उत्पादनात सुमारे ३५ लाख टन घट येण्याचा अंदाज संयुक्त राष्ट्राच्या जागतिक अन्न संघटनेकडून (एफएओ) व्यक्त करण्यात आला आहे. जगात दरवर्षी सरासरी १७०८.६२ लाख टन साखर उत्पादन होते. जागतिक अन्न संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरात सक्रिय असलेल्या एल निनोमुळे आशियायी देशांत पर्जन्यवृष्टीत तूट निर्माण झाली आहे. जगभरात सरासरी तापमानात वाढ झाली आहे. अपुरा पाऊस आणि उष्णतेमुळे उसाच्या वाढीवर परिणाम झाला आहे. साखर उत्पादक चीन, थायलंड, भारत, पाकिस्तान या आशियायी देशांच्या साखर उत्पादनात तूट येण्याचा अंदाज आहे. थायलंडमध्ये सरासरी १०० लाख टनांवरून ८० लाख टनांवर तर भारतात साखर उत्पादन ३३७ लाख



टनांपर्यंत खाली येण्याचा अंदाज आहे. २०२१-२२ मध्ये देशात ३५८ लाख टन साखर उत्पादन झाले होते. एफएओच्या माहितीनुसार, जागतिक साखर बाजारात २००९ नंतर साखरेचा साठ्यात यंदा मोठी घट होणार आहे. जागतिक साखर बाजारात दोन महिन्यांत साखरेच्या दरात ५५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. भारतीय साखर कारखाना संघाने (इस्मा) भारताच्या साखर उत्पादनात आठ टक्क्यांनी घट होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. थायलंडच्या साखर कारखाना संघटनेने १५ टक्क्यांची घट होण्यासह उसाच्या उत्पादनावर आणि दर्जावरही परिणाम झाल्याचे म्हटले आहे. अमेरिकेच्या कृषी विभागानेही थायलंडमधील साखर उत्पादनात १५ टक्क्यांनी घट होण्याच्या अंदाजाला दुजोरा दिला आहे. जागतिक साखर संघटना आणि ग्रो इंटेलिजेन्स, या कृषी क्षेत्राचा अभ्यास करणाऱ्या खासगी फर्मने ब्राझीलमधील साखर उत्पादनात २० टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. ब्राझीलमध्ये उसाची उपलब्धता चांगली असल्यामुळे यंदा साखर उत्पादन ४२१ लाख टनांवर जाण्याचा अंदाज आहे. एल-निनोमुळे जगभरातील अन्य देशांत साखर उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहे. त्या पार्श्वभूमीवर जागतिक साखर बाजाराला ब्राझीलमधील उत्पादनामुळे दिलासा मिळणार आहे.